जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/परोआर.
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे. १.
दिनांक :- 29 AUG 1991

प्रति,

शिक्षणाधिकारी [प्राथ. विभाग]
जिल्हा परिषद,
पुणे.

विषय :- सन १९९१-९२ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. व्हीएलएस १०९१/(५९३९) प्राशि ३ दिनांक १७.८.९१ चे पत्र.

---

उपरोक्त विषया संबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदी ला अपवाद करून खाली नमूद केलेल्या संस्थेला नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून १९९१ पासून इयत्ता १ली ते सन १९९१-९२ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याचा शर्तीवर विनाअनुदान तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|
| श्री गुरुदेव गोरोबा स्मारक समिती, उमरखेड, जि. यवतमाळ. | एस. आर. पी. कॅंप, दौंड. | १ली ते ९१-९२ च्या शै. वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह. | मराठी |

---

१] संस्था सदर शाळा विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहिजे.

२] संस्थेने शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहित केलेल्या अटीनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांची सोय केली पाहिजे तसेच शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहित केलेल्या दरानेच वतन व भत्ते दिले पाहिजेत.

३] संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाची उदा. वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इत्यादी काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

४] संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही दुष्परिणाम होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

५] ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करून घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

[१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणी कृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

[२] संस्थे विरुद्ध गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

[३] सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळा की एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

[४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचा गैर व्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

[५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

[६] संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करून घ्यावा.]

[७] शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालु ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु.५००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. सदर प्राथमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही दिनांक १५.९.९१ पर्यंत पूर्ण करुन त्याबाबतचा सविस्तर अहवाल दिनांक ३०.९.९१ पर्यंत या कार्यालयास पाठवावा. संस्थेने वरीलपैकी कोणतीही अट पालन करण्यात असमर्थता दर्शविली तर संस्थेला दिलेल्या परवानगीचा फेरविचार तात्काळ करावा व तसा अहवाल या कार्यालयास पाठवावा.

(सही)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

जिल्हा ———————— यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत :- मा. सचिव, श्री. गुरुदेव गोरोबा स्मारक समिती, उमरखेड, जि. यवतमाळ द्वारा एस. आर. पी. कॅम्प दौंड ———— यांना माहितीसाठी

अग्रेषित.

पटवेकर/२०८९.

वाचले:- १] मा. शिक्षण उप संचालक पुणे विभाग पुणे यांचे पत्र क्रं. प्रा. शि/प्रा खाप्राशा-पुणे/पु. वि/२००१ दि. १८-८-२००१.

---

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण विभाग [ प्राथमिक ]
जा. क्र. जिप/शिक्षण/प्राथ-२/१५/२१/२००१.
पुणे-१. दिनांक:- १०-८-२००१.

विषय:- खाजगी अनुदानित/विनाअनुदानित/कायम विना अनुदानित- प्राथमिक शाळांना सन-२०००-२००१ यावर्षी इ. १ली ते ७वी चे नवीन अतिरिक्त तुकडया वर्ग मंजूर करणे बाबत.

आदेश.

उपरोक्त विषय व संदर्भानुसार शासनाने ज्या खाजगी प्राथमिक शाळांच्या अतिरिक्त वर्ग व तुकडयांना खाली नमुद केलेल्या अटी व शर्तींची शाळा पूर्तता करील व त्यांच्या अधिन राहून मंजूरी देणेत आलेली आहे. त्या शाळांची - यादी मंजूर केलेल्या वर्ग / तुकडयांसह सोबत जोडलेली आहे.

शर्ती व अटी. :-

अ] शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिकअर्हतेच्या आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्यात व सेवा शर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

ब] सदर शाळेने तुकडयांसाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्धकरुन द्यावयास हव्यात.

क] सदर शाळेत स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

ड] शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

ई] सदर मंजूर करण्यात येणाऱ्या तुकडीमुळे परिसरातील ईतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे हे आवश्यक आहे.

ई] सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या शासन निकषाप्रमाणे असणे आवश्यक आहे.

फ] वरीलपैकी एक जरी अट नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करणेत येईल.

[signature]

शिक्षणाधिकारी [ प्राथमिक ]
पुणे जिल्हा परिषद, पुणे.

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

- - - - - - - - - - - - - - - - - -

- - - - - - - - - - - - - - - - - -

प्रत:- विस्तार अधिकारी, पंचायत समिती/मुख्यालय————— यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी.

२/- सदर शाळेस ज्या वर्ग/तुकडयांना मंजूरी दिलेली आहे. त्यांची पूर्तता वरील शर्ती व अटी नुसार होते किंवा नाही याची समक्ष तपासणी करुन अहवाल या कार्यालयास १ महिन्याचे आत पाठविण्याची दक्षता घ्यावी.

प्रत:- मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कडे माहितीस सादर, अग्रेषित.

शिक्षणाधिकारी [प्राथमिक]
जिल्हा परिषद, पुणे-११

शासन परिपत्रक क्र. व्हीएलएस-१०००/[७४३/२००१]प्राशि-३ दि-११. ७. २००१ अन्वये खाजगी अनुदानित/विनाअनुदानित प्राथमिक शाळांना सन-२०००-२००१ या वर्षी इयत्ता १ ली ते ७ वी चे नवीन अतिरिक्त वर्ग/तुकडयांना मंजूरी देणेत आलेल्या प्राथमिक शाळा खालील प्रमाणे.

| अ. क्र. | शाळेचे नाव | माध्यम | शासनाने मंजूर केलेली अतिरिक्त तुकडी/नविन वर्ग | | | | | | | मंजूरीचा प्रकार. अनुदानित/विनाअनुदानित/कायमविनाअनुदानित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | | | | | | | ५. |
| १] | श्री. शंभु महादेव प्राथमिक | मराठी | १ ली | २ री | ३ री | ४ थी | ५वी | ६वी | ७वी | विना- |
| | विद्या. फुरसुंगी ता. हवेली | -"- | दुसरी | दुसरी | - | - | - | - | - | -अनुदानित |
| २] | मातोश्री पार्वतीबाई कुंभार प्राथमिक विद्यालय एस. आर. पी. कॅम्प दौण्ड ता. दौण्ड जि. पुणे | -"- | दुसरी | दुसरी | तिसरी | - | - | - | - | —"— |
| | | | तिसरी | तिसरी | - | - | - | - | - | —"— |
| ३] | प्रज्ञा प्राथमिक विद्यालय फुरसुंगी ता. हवेली | -"- | दुसरी | - | - | - | - | - | - | —"— |
| ४] | विद्या प्रतिष्ठानची मराठी प्राथ. शाळा बारामती जि. पुणे | -"- | चौथी | तिसरी | चौथी | चौथी | - | - | - | —"— |
| | | | - | व | - | - | - | - | - | |
| | | | - | चौथी | - | - | - | - | - | |
| ५] | आदर्श विद्यामंदीर शाळा क्रं. ३ भेकराईनगर, फुरसुंगी ता. हवेली जि. पुणे | -"- | तिसरी | - | - | - | - | - | - | —"— |

शिक्षणाधिकारी [प्राथमिक]
जिल्हा परिषद, पुणे-११

|| जय गुरुदेव ||

श्री गुरुदेव गोरोबा स्मारक समिती उमरखेड, जि यवतमाळ द्वारा संचलित

# मातोश्री पार्वतीबाई कुंभार प्राथमिक शाळा



एस.आर.पी.कॅम्प, ता.दौंड, जि.पुणे, पिन-४१३८०१

शाळा मान्यता क्र.व्ही एल एस १०९१/५९३९ प्रा.शि.३ दि.१७/०८/९१ -यु.डायस नं.२७२५०४०५५०४

Email id-mpkpdaund@gmail.com www.matoshripkschool.org शालार्थ आय डी.-०३२२०१००२६५

**श्री.थोरात संभाजी शंकर** – मुख्याध्यापक ९४२३२२१९५९
**श्री.श्रीनिवास धामणकर** – सहसचिव/मुख्यकार्यकारी अधिकारी
**श्री.सुभाष गणपत डावरे** – सचिव
**श्रीमती प्रितीताई धामणकर** – अध्यक्ष

जा.क्र.

दि.०८/११/२०२३

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, शिक्षणविभाग/ प्राथ. २१७५/२९/२००१ पुणे-१. दि. २०/०८/२००१ रोजी प्राप्त अतिरिक्त तुकड्या वर्ग मंजूरी मुळ पत्र गहाळ झाले आहे.

मुख्याध्यापक
मातोश्री पार्वतीबाई कुंभार प्रा. शाळा
(लिंगाळी) एस आर पी कॅम्प, दौंड

जग हे करणे शहाणे बप्पा
मातोश्री पार्वतीबाई कुंभार प्राथमिक शाळा दौंड

मातोश्री पार्वतीबाई कुंभार
आ. क्र. ४५
दि. ५।११।२००९
प्राथमिक शाळा, एस.आर.पी.कॅम्प,दौंड

जाक्रप्रा./प्राशि/खाप्राशा-तुमा/पुवि/०६/२६८६३/६५
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 23 OCT 2009

प्रति
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

विषय : खाजगी अनुदानित/विनाअनुदानित/प्राथमिक शाळांना सन २००१-०२, या वर्षी इयत्ता १ ली ते ७ वी चे नैसर्गिक वाढीचे वर्ग/अतिरिक्त तुकड्या मंजूर करणेबाबत.

संदर्भ : १. मा. शालेय शिक्षण विभागाकडील शासन परिपत्रक क्र. व्हीएलएस-१००३/(८५६/,प्राशि-३, दि. ६ सप्टेंबर २००३
२.या कार्यालयाचे जा.क्र.प्रा/प्राशि३/खाप्राशा/पुवि/०६/२५०१५-१७, दिनांक ७.१०.२००३ चे आदेश

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भ क्रमाक २ अन्वये देण्यात आलेले आदेश रदद करण्यांत येत असून खाली नमूद केलेल्या शाळेच्या इयत्ता संदर्भात सुधारित आदेश देण्यांत येत आहेत.

सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षात उपरोक्त विषयाबाबतचे प्राप्त झालेल्या प्रस्तावास संदर्भाधीन शासन पत्रान्वये खाली नमूद केलेल्या शाळेस नैसर्गिक/ अतिरिक्त वाढीच्या वर्गांना विनाअनुदान तत्वावर मंजूरी मिळालेली आहे. त्यानुसार सदर शाळेस खालील अटींच्या अधीन राहून वर्गांना मंजूरी देण्यांत येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नांव | माध्यम | क्षेत्र | इयत्ता | तुकडी | मंजूरी वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मातोश्री पार्वतीबाई कुंभार प्राथ शाळा एसआरपी कॅम्प, दौंड, ता. दौंड जि. पुणे | मराठी | जि.प. | ४थी | दुसरी | जुन २००१ |
| | | | | | तिसरी | जुन २००१ |

१. नसर्गिक वाढीचे वर्ग शासन निर्णय दि. २.१२.१९९६ मध्ये नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्यात यावी.

२. मंजूर करावयाच्या नैसर्गिक वाढीचे वर्ग / तुकड्यांची गरज आहे, याची खातरजमा करुन त्यानंतरच वर्ग/तुकड्या मंजूर करण्यात याव्यात.

४. सदर शाळांतील प्रथम वर्गास मंजूरी देण्यात आलेली आहे. त्या वर्गास शासन निर्णय क्रमांक व्हीलएलएस-१०००/(२४५५)/प्राशि-१, दि. ८.११.२००० मध्ये नमूद केलेले सूत्र लागू होईल.

सदर शाळांना वर्ग मंजूरी आदेश आपण आपले स्तरावरुन तात्काळ निर्गमित करण्यात यावेत.

स्थळप्रतीवर मा. शि. उ. सं.
यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत माहितीस्तव सादर
१.मुख्याध्यापक, मातोश्री पार्वतीबाई कुंभार प्राथ शाळा,एसआरपी कॅम्प दौंड ता. दौंड जि.पुणे.
२. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक),
प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.